# भेंडीबाजारात पंचतारांकित संक्रमण शिबीर

## पुनर्विकासादरम्यान व्यापाऱ्यांसाठी आलिशान इमारत



**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

भेंडीबाजारचा पुनर्विकास हा दक्षिण मुंबईतील महत्त्वाकांक्षी प्रकल्प. विकास नियंत्रण नियमावली अधिनियम ३३ (९) अंतर्गत हा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. १६.५ एकरची ही जागा नऊ टप्प्यांत विकसित करण्यात येणार आहे. या भागात मोठ्या प्रमाणात व्यावसायिक गाळे असल्यामुळे विकासप्रक्रियेदरम्यान त्यांच्या व्यवसायावर परिणाम होऊ नये, म्हणून त्यांच्यासाठी २०० गाळे बांधण्यात आले आहेत.

भेंडीबाजार ही एकेकाळची मोठी बाजारपेठ. इथल्या इमारती खासगी मालकीच्या आणि सर्वसाधारणपणे १०० वर्षे वयोमान असलेल्या. सैफी बुऱ्हाणी अपलिफ्टमेंट ट्रस्टने (एसबीयूटी) या प्रकल्पाचा पुनर्विकास हाती घेतला असून, तीन हजार कोटींच्या प्रकल्पासाठी नुकतेच ग्लोबल टेंडर काढण्यात आले. भेंडीबाजारच्या विकासासाठी येथील १६.५ एकर जमिनीचे नऊ क्लस्टर करण्यात आले. एकेका क्लस्टरचा टप्प्याटप्प्याने विकास करण्यात येणार आहे. व्यावसायिकांसाठी नूरबाग या भागात मुफद्दल शॉपिंग आर्केड हा ट्रान्झिट कॅम्प बांधण्यात आला. २०० गाळ्यांचे हे बांधकाम संक्रमण शिबिराची व्याख्या बदलणारे आहे.

### ही तर केवळ झलक

आम्हाला भेंडी बाजारचा ज्याप्रकारे विकास करायचा आहे, त्याची ही केवळ एक झलक आहे, अशी माहिती एसबीयूटीचे प्रवक्ते शेख अब्दाली भानपूरवाला यांनी दिली आहे. माझगाव अंजीरवाडीमध्ये बांधण्यात आलेल्या १३०० निवासी सदनिकाही देखण्या आणि सेल्फकंटेंड आहेत.

### ९० दिवसांत उभारणी

नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मोहरम सुरू होत असल्यामुळे त्या आधी किमान महिनाभर व्यापाऱ्यांना इथे हलवणे भाग होते. त्यामुळे या ट्रान्झिट कॅम्पची परवानगी मिळाल्यानंतर तत्काळ काम हाती घेण्यात आले. तज्ज्ञ आर्किटेक्टने आराखडा आधीच बनवला होता. १ जुलैला काम सुरू झाले आणि ३० सप्टेंबरला ही वास्तू उभी राहिली. भेंडीबाजार प्रकल्प साकारल्यानंतर ही वास्तू तोडण्यात येणार आहे.

- शॉपिंग सेंटरला मॉलसारखे रूप
- सेंटरला तीन भव्य प्रवेशद्वारे
- एस्कलेटर, लिफ्ट
- उत्तम आंतरबाह्य रचना
- ग्रॅनाइट फ्लोअरिंग, देखणे वॉशरूम ० प्रार्थना करण्यासाठी प्रत्येक मजल्यावर स्वतंत्र गाळे
- बांधकामासाठी वजनाने हलके आणि इको फ्रेंडली एईसी ब्लॉक्सचा वापर